फाईल क्र.1442/गट -क संयुक्त-लिपिक/2019/तेरा-ब                                                       दि. 14 जुलै, 2020

## महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-2019
## लिपिक टंकलेखक (मराठी/इंग्रजी) पदाचा अंतिम निकाल
## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 6 व 10 ऑक्टोबर, 2019 रोजी **"महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-2019 (जाहिरात क्र.14/2019) मधील लिपिक-टंकलेखक (मराठी/इंग्रजी)** या संवर्गातील एकूण 179 (मराठी-162 व इंग्रजी-17) पदांकरिता परीक्षा घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेसाठी संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेले दावे निकालासाठी विचारात घेऊन सदर दाव्यांच्या अनुषंगाने शिफारसपात्र उमेदवारांची पात्रता शासन स्तरावर, मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, सदर परीक्षेचा निकाल दि. 14 जुलै, 2020 रोजी जाहीर करण्यात आला आहे.

2. सदर परीक्षेमध्ये **सांगली** जिल्ह्यातील **श्री. लाड विजय पोपट (बैठक क्र.PN001355)** हे राज्यात व मागासवर्गवारीतून **प्रथम आले आहेत.** तसेच महिलांमध्ये **अमरावती** जिल्ह्यातील **श्रीमती चौधरी प्राजक्ता राजकुमार (बैठक क्र. NG001067)** ह्या प्रथम आल्या आहेत.

3. अपंगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकीय मंडळाकडून तपासून घेण्याच्या अधीन राहून त्यांची शिफारस करण्यात येत आहे. अपंग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक अप्रकि-2018/प्रक्र.46/आरोग्य-6, दि.14/9/2018 मधील आदेशानुसार SADM या संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

4. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक ) खेडाळूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दि.18 ऑगस्ट, 2016 व दि.11 मार्च, 2019 रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकीत गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांकास (6 मे, 2019) किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी शासनाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

5. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात/मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

6. प्रस्तुत परीक्षेच्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांनी "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्र. 3.8 पहावी).

7. सदर निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**उपसचिव (परीक्षा-2)**

**ठिकाण : मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग**